INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# सर्किट बेंच स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या व्यावसायिक आणि रोजगार क्षेत्रात होणारे बदल : विश्लेषणात्मक अभ्यास

## (An Analytical Study of the Changes in the Business and Employment Sectors of Kolhapur District Due to the Establishment of a Circuit Bench)

**डॉ. सुजाता जितेंद्र पाटील**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
महावीर महाविद्यालय,
कोल्हापूर (महाराष्ट्र, भारत)

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/08.2025-33896439/IRJHIS2508015

***गोषवारा :***

*कोल्हापूरमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे पाचवे सर्किट खंडपीठ 18 ऑगस्ट 2025 पासून कार्यान्वित होणार आहे,असे निर्णय मुख्य न्यायाधीश अलोक अराध्य यांनी राज्यपालांच्या मंजुरीने प्रसिद्ध केले.सर्किट बेंचची स्थापना ही केवळ न्यायप्रणालीसाठीच नव्हे, तर स्थानिक सामाजिक व आर्थिक विकासासाठीदेखील एक निर्णायक पाऊल ठरू शकते. कोल्हापूर जिल्हा हा ऐतिहासिक, सांस्कृतिक व औद्योगिक दृष्टिकोनातून प्रगत भाग असून, येथे सर्किट बेंच स्थापन झाल्यामुळे कायदासंबंधित सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील. या सुविधेमुळे वकिल, न्यायालयीन कर्मचारी, पूरक सेवा क्षेत्र यामध्ये रोजगाराच्या संधी वाढतील. त्याचबरोबर लॉजिंग, खानपान, स्टेशनरी, ट्रॅव्हल इत्यादी व्यवसायांना चालना मिळेल. या संशोधनात कोल्हापूरच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा, सध्याच्या आर्थिक स्थितीचा व संभाव्य बदलांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. निष्कर्षतः, सर्किट बेंच ही संकल्पना कोल्हापूरसारख्या प्रगत जिल्ह्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. हे खंडपीठ कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना न्यायालयीन सुविधा उपलब्ध करवेल, ज्यामुळे न्यायमित्रांना प्रवासाचा त्रास व खर्च कमी होईल.*

***मुख्य शब्द :*** *मुंबई उच्च न्यायालय, सर्किट खंडपीठ,सर्किट बेंच,आर्थिक विकास*

### १- प्रस्तावना :

कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रगत, सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा भाग आहे. जिल्ह्याची अर्थव्यवस्था कृषी, उद्योग, सेवा व पर्यटन क्षेत्रावर आधारित असून, इथे मोठ्या प्रमाणावर लघुउद्योग व स्वयंपूर्ण व्यवसाय सुरू आहेत. महाराष्ट्रातील एक समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक जिल्हा – अनेक दशके उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचसाठी मागणी करत होता. जिल्ह्यात विविध कोर्टे असली, तरी

मुंबई किंवा औरंगाबाद उच्च न्यायालयात जाणे अनेक नागरिकांसाठी खर्चिक, वेळखाऊ आणि मानसिकदृष्ट्या क्लेशदायक होते. अशावेळी, सर्किट बेंचची स्थापना ही एक सामाजिक गरज होती.

सध्या उच्च न्यायालयाचे सर्व कामकाज मुंबई किंवा औरंगाबाद येथे पार पडते, त्यामुळे कोल्हापूरमधील जनतेला न्याय मिळवण्यासाठी मोठा प्रवास व वेळ खर्च करावा लागतो. सर्किट बेंच सुरू झाल्यानंतर कोल्हापूरमधील कायदा, व्यापार आणि रोजगार क्षेत्रात विकसित होण्याची चांगली संधी निर्माण झाली आहे.मात्र, त्याचा परिणाम केवळ न्यायप्रणालीपर्यंत मर्यादित राहिला नाही.सर्किट बेंच स्थापन झाल्यानंतर कोल्हापूरमध्ये एक नवीन व्यावसायिक परिसंस्था (ecosystem) उभी राहिली, ज्यात स्थानिक उद्योग, लघु व्यवसाय, सेवाक्षेत्र, आणि रोजगार यामध्ये महत्त्वपूर्ण वाढ झाली.

**२- सैद्धांतिक चौकट :**

सर्किट बेंच स्थापनेचा अभ्यास करताना "Growth Pole Theory" वापरता येईल – जी सांगते की, एखाद्या विशिष्ट क्षेत्रात जर एक महत्त्वाची सार्वजनिक संस्था स्थापन झाली, तर तिच्याभोवती इतर आर्थिक क्रिया व संधी निर्माण होतात.

Multiplier Effect या संकल्पनेनुसार सुद्धा – कोर्टाच्या स्थापनेमुळे केवळ न्यायालयीन सेवा नाही तर, खाणेपिणे, निवास, दस्तऐवज सेवा, टेक्निकल सपोर्ट, वाहतूकयांसारख्या पूरक सेवा सुरू होतात, जे अनेक लोकांना अप्रत्यक्ष रोजगार देतात.

**३- ऐतिहासिक पार्श्वभूमी व कोल्हापूरचे महत्त्व :**

कोल्हापूरचा इतिहास सामाजिक सुधारणांनी व समृद्धीने भरलेला आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यकाळात सामाजिक न्याय, शिक्षण आणि आर्थिक विकासाला चालना मिळाली. आजही कोल्हापूरचे उद्योग, शिक्षणसंस्था, आरोग्यसेवा आणि पर्यटन स्थळे हे जिल्ह्याच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे योगदान देतात. येथील गूळ, दूध, चप्पल, वस्त्रोद्योग, शिल्पकला आणि MSME क्षेत्र हे जिल्ह्याचे आर्थिक मेरुदंड आहेत.

**४- सर्किट बेंच म्हणजे काय?**

**सर्किट बेंच** म्हणजे उच्च न्यायालयाचे एक **तात्पुरते उपपिठ** किंवा **अस्थायी खंडपीठ**, जे मुख्य न्यायालयापासून दूर असलेल्या भागांमध्ये न्यायसेवा पोहोचवण्यासाठी कार्यरत असते. हे खंडपीठ एखाद्या विशिष्ट ठिकाणी, ठराविक कालावधीसाठी (जसे की काही आठवडे किंवा महिने) खटल्यांची सुनावणी करते. त्यामुळे हे पूर्णवेळ आणि कायमस्वरूपी असलेल्या खंडपीठापेक्षा वेगळे असते.

**५- सर्किट बेंच का स्थापन करतात?**

सर्किट बेंच स्थापन करण्यामागचाप्रमुख हेतूम्हणजेदुर्गम किंवा ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत न्यायालयीन सेवा सुलभतेने पोहोचवणे,तसेच मुख्य न्यायालयांमध्ये वाढलेल्या खटल्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे.यामुळेयाचिकाकर्ते, वकील आणि साक्षीदारयांना मोठ्या शहरात (जसे की मुंबई) जाऊन केस लढण्याची गरज राहत नाही. प्रवासाचा वेळ, खर्च आणि मानसिक त्रास टाळता येतो.

**६ – संशोधनाची उद्दिष्टे :**

१. सर्किट बेंच स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्यात कायदा संबंधित सेवांच्या उपलब्धतेवर होणारा परिणाम जाणून घेणे.

२. स्थानिक व्यवसायांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करणे.

३. रोजगार निर्मितीच्या नव्या संधींचा मागोवा घेणे.

४. पूरक सेवा व व्यवसायांवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करणे.

**७ – संशोधन पद्धती :**

हे संशोधन प्रामुख्याने माध्यम विश्लेषण, आधीच्या अहवालांचा अभ्यास, संबंधित व्यक्तींच्या अभिप्राय व क्षेत्रीय माहिती संकलनाच्या आधारे करण्यात आले आहे. प्रत्यक्ष भेटी, अभ्यास, आणि विश्लेषणाद्वारे विविध क्षेत्रातील जाणकारांच्या मतांचा विचार केला गेला आहे.

**८ – विश्लेषण :**

**अ - सर्किट बेंच स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्यात कायदासंबंधित सेवांच्या उपलब्धता:**

कोल्हापूर जिल्हा सध्या कायदासंबंधी मोठ्या प्रमाणावर मुंबई, पुणे किंवा औरंगाबाद उच्च न्यायालयांवर अवलंबून आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना त्यांच्या प्रकरणांसाठी दूर अंतर प्रवास करावा लागतो, जे वेळ, पैसा आणि ऊर्जा यांच्या दृष्टीने अत्यंत खर्चिक ठरते. विशेषतः ग्रामीण व निम्न आर्थिक स्तरातील नागरिकांसाठी ही प्रक्रिया अधिक क्लिष्ट ठरते.

**ब - स्थानिक न्यायप्रणालीला गती:**

प्रकरणांची सुनावणी स्थानिक पातळीवर होऊ लागल्याने प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होईल आणि न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतीशील बनेल.

**क - वकिलांना संधी आणि स्थायिकता:**

कोल्हापूरमधील वकिलांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होतील. त्यांना शहराबाहेर जाऊन प्रॅक्टिस करण्याची गरज भासणार नाही, ज्यामुळे स्थानिक कायदा व्यवसायात वाढ होईल.

**ड - न्यायालयीन सुविधा आणि पायाभूत रचना:**

सर्किट बेंचसाठी स्वतंत्र न्यायालयीन इमारती, न्यायमूर्तींची नेमणूक, कर्मचारी वर्ग, तसेच कचेऱ्यांचे जाळे तयार केले जाईल, ज्यामुळे स्थानिक प्रशासन मजबूत होईल.

**इ - कायदासल्ला, नोटरी व दस्तऐवजीकरण सेवा उपलब्ध होणे:**

सध्या अनेक कायदेशीर सेवा केंद्रीकृत ठिकाणी मर्यादित आहेत. सर्किट बेंचमुळे हे सर्व सेवा अधिक व्यापक आणि सहज उपलब्ध होतील.

**ई - सामान्य नागरिकांचा विश्वास:**

न्यायालयीन सेवा जवळ उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांचा न्यायप्रणालीवरचा विश्वास वाढेल. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील लोकांकरिता ही सुविधा मोठा दिलासा ठरेल.

1. **उच्च शिक्षण व प्रशिक्षण संधी:**

कायदा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप व शिक्षणासाठी स्थानिक संधी उपलब्ध होतील. बार कौन्सिल व लॉ कॉलेजेस यांच्या सहकार्याने व्यावसायिक कार्यशाळा आयोजित करता येतील.




वरील ***पाय चार्ट*** सर्किट बेंचच्या स्थापनेनंतर कोल्हापूर जिल्ह्यात कायदासंबंधित सेवांच्या उपलब्धतेत होणाऱ्या बदलांचे विविध पैलू स्पष्ट करतो:

**१- स्थानिक प्रकरणांची सुनावणी सोपी होते (30%)** – स्थानिक लोकांना आपली प्रकरणं पुणे किंवा मुंबईऐवजी कोल्हापुरातच हाताळता येतील.

**२- वकिल व कायदा सल्लागारांना संधी (25%)** – स्थानिक वकिलांसाठी व्यवसायाच्या नव्या संधी निर्माण होतात.

**३- प्रवासाचा खर्च व वेळ वाचतो (20%)** – नागरिकांना दूर प्रवासाची गरज राहत नाही, त्यामुळे आर्थिक व मानसिक बचत होते.

**४- नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास वाढतो (15%)** – जवळपास न्याय मिळाल्यामुळे जनतेचा विश्वास अधिक दृढ होतो.

**५- पूरक कायदासंबंधित सेवा उपलब्ध होतात (10%)** – नोटरी, दस्तऐवज सेवा, टायपिंग, लॉ फर्म्स इ. सेवांमध्ये वाढ होते.

सर्किट बेंचच्या स्थापनेमुळे स्थानिक कायदाव्यवस्थेत काय धोरणात्मक बदल होतील, हे ठळकपणे समजण्यास मदत करेल.

**ब- न्यायालयीन बेंच स्थापन होण्याच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरातील व्यवसायिक क्षेत्राला होणारा संभाव्य विकास.**

सर्किट बेंच ही उच्च न्यायालयाची उपशाखा असते जी मुख्यालयापासून दूरस्थ भागात न्यायदानाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी स्थापन केली जाते. कोल्हापूर जिल्ह्यात अशा सर्किट बेंचची स्थापना होणे केवळ कायदासंस्थेच्या दृष्टीनेच नव्हे, तर स्थानिक अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठीही महत्त्वपूर्ण ठरू शकते.

**१- हॉटेलिंग आणि लॉजिंग व्यवसायात वाढ :**

सर्किट बेंच कार्यरत झाल्यानंतर विविध न्यायप्रकरणांसाठी वकील, पक्षकार तसेच इतर संबंधित व्यक्ती कोल्हापूरमध्ये ये-जा करतील. यामुळे हॉटेलिंग आणि लॉजिंग व्यवसायात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. हॉटेल्स, लॉज, गेस्ट हाऊस यांची मागणी वाढेल आणि स्थानिक जेवणगृहे, खानावळी, तसेच कॅफेंना अधिक ग्राहक मिळतील. परिणामी, कोल्हापुरातील आदरातिथ्य व खाद्यव्यवसायाला चालना मिळेल.

**२- प्रवास आणि वाहन सेवा क्षेत्रातील संधी :**

सर्किट बेंचच्या स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्यात विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये नवीन संधी निर्माण होतील. प्रवास आणि वाहन सेवा क्षेत्रात स्थानिक रिक्षा, टॅक्सी चालक तसेच ओला/उबर ड्रायव्हर्स यांना अधिक काम मिळण्याची शक्यता आहे. टूर अँड ट्रॅव्हल्स एजन्सी आणि गाड्या भाड्याने देणाऱ्या व्यवसायांनाही याचा फायदा होईल.

**३- स्टेशनरी, प्रिंटिंग आणि झेरॉक्स व्यवसाय :**

न्यायालयीन प्रक्रियेतील दस्तऐवजांच्या छपाई, झेरॉक्स, टायपिंग, नोटरी आदी सेवांची मागणी वाढल्यामुळे स्टेशनरी, प्रिंटिंग आणि झेरॉक्स व्यवसायातही वाढ होईल. परिणामी, कोर्ट परिसरातील स्टेशनरी दुकानदारांना वाढीव उत्पन्न मिळू शकते.

**४- वकिल, कायदा सल्लागार आणि लॉ फर्म्स :**

वकिल, कायदा सल्लागार आणि लॉ फर्म्स यांनाही स्थानिक स्तरावर प्रॅक्टिस करण्याची संधी मिळेल. विशेषतः तरुण वकिलांना पुणे-मुंबईला न जाता कोल्हापुरातच करिअर करण्याचा मार्ग खुला होईल. त्यामुळे नवीन लॉ फर्म्स व कायदेशीर सल्ला केंद्रांची स्थापना होऊ शकते.

**५- व्यावसायिक कार्यालये व रिअल इस्टेट :**

कोर्टाच्या परिसरात व्यावसायिक कार्यालयांसाठी जागेची मागणी वाढेल, ज्यामुळे रिअल इस्टेट क्षेत्रात भाडे व जमिनीच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. कोर्टाशी संबंधित टेंडर एजंट्स, पुरवठादार यांचीही गरज भासेल.

**६ - IT आणि डिजिटल सेवा प्रदाते :**

न्यायालयीन प्रक्रियेत डिजिटल डॉक्युमेंट्स, ई-फायलींग, वेबसाइट्स व ई-मेल सेवा आवश्यक असल्यामुळे स्थानिक IT कंपन्यांना नव्या संधी प्राप्त होतील. डिजिटल सेवांचा वापर वाढल्यामुळे IT क्षेत्रालाही चांगली चालना मिळेल.

**क- सर्किट बेंच स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्यात रोजगार निर्मितीच्या नव्या संधीं**

कोल्हापूर जिल्ह्यात सर्किट बेंचची स्थापना होणे ही केवळ कायदासंबंधी सुविधा वाढवणारी घटना नाही, तर स्थानिक रोजगार निर्मितीसाठी एक सुवर्णसंधी आहे. या संस्थेच्या स्थापनेमुळे विविध थेट आणि अप्रत्यक्ष स्वरूपाचे रोजगार तयार होण्याची शक्यता आहे.

सर्किट बेंचच्या स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्यात विविध स्तरांवर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. न्यायव्यवस्था सेवा क्षेत्रात न्यायालयीन लिपिक, शिपाई, स्टेनोग्राफर, सहाय्यक, रेकॉर्ड कीपर, PA, रिसर्च असिस्टंट, कोर्ट मॅनेजर यांसारख्या पदांसाठी भरती होईल. स्थानिक वकिल, इंटर्न, कायदा सल्लागार संस्था, NGO आणि Legal Aid Services यामधूनही रोजगार वाढेल. पूरक सेवा आणि पुरवठा उद्योगात प्रिंटिंग, झेरॉक्स, स्टेशनरी, टायपिंग, नोटरी, डेटा एंट्री, दस्तऐवज व्यवस्थापन, सफाई कामगार व सुरक्षा रक्षक यांसारख्या सेवा आवश्यक ठरतील. प्रवास आणि वास्तव्य क्षेत्रात हॉटेल व लॉजमधील रिसेप्शनिस्ट, हाउस कीपिंग कर्मचारी, शेफ, वेटर, तसेच वाहन चालक, ट्रॅव्हल एजन्सीचे कर्मचारी, स्थानिक गाइड यांच्यासाठी संधी निर्माण होईल. शिक्षण व प्रशिक्षण क्षेत्रात लॉ कॉलेजेस, प्रशिक्षण संस्था, गेस्ट लेक्चरर, ट्रेनर व प्रॅक्टिकल कोच यांच्यासाठी नवीन दरवाजे उघडतील. स्थापत्य आणि बांधकाम क्षेत्रात कोर्ट इमारती व पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी अभियंते, मजूर,

सुपरवायझर यांना काम मिळेल. एकूणच, सामान्य शिक्षण घेतलेल्या युवकांपासून ते विशेष तज्ज्ञांपर्यंत सर्वांसाठी ही संधी दीर्घकालीन स्थायित्व आणि प्रगती घडवून आणणारी ठरू शकते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या संभाव्य रोजगार संधींचा अभ्यास करून युवकांना योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे.

**सर्किट बेंचच्या स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्यात** सामान्य शिक्षण असलेल्या युवकांपासून ते विशेष तज्ञांपर्यंत **विविध स्तरांवर रोजगार उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या संभाव्य रोजगार संधींचा अभ्यास करून** युवकांना योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण **देण्यावर भर द्यावा, हे काळाची गरज ठरेल.**

**ड - सर्किट बेंचच्या स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील पूरक सेवा व व्यवसायानां मिळणारी चालना :**

कोल्हापूर जिल्ह्यात सर्किट बेंच स्थापन झाल्यामुळे, थेट कायदायंत्रणेतील बदलांशिवाय अनेकपूरक सेवा व व्यवसायांवरप्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम होतील. या सेवांचा न्यायालयाशी थेट संबंध नसला तरी ते न्यायप्रक्रियेला सहाय्यभूत ठरतात. त्यांच्यावरील परिणाम जिल्ह्याच्या एकूणच आर्थिक गतिशीलतेला गती देणारा ठरू शकतो.

सर्किट बेंचच्या स्थापनेमुळे कोल्हापूर जिल्ह्यातील विविध पूरक सेवा आणि व्यवसायांना नवे बळ मिळणार आहे. जरी या सेवा न्यायप्रक्रियेशी थेट संबंधित नसल्या, तरी त्या न्यायालयीन कामकाजाच्या सुरळीततेसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत आणि त्यामुळेच जिल्ह्याच्या एकूण आर्थिक गतिशीलतेला चालना देण्याची क्षमता त्यांच्यात आहे. स्टेशनरी, प्रिंटिंग आणि झेरॉक्स सेवांमध्ये दस्तऐवज छपाई, नोटरी कागदपत्रे, अर्ज, प्रत, टायपिंग यांसाठी मोठ्या प्रमाणावर मागणी निर्माण होईल. झेरॉक्स दुकाने, टायपिस्ट आणि नोटरी सेवा यांची संख्या वाढू शकते. वकिल, पक्षकार आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांना दिवसातून अनेक वेळा जेवणाची गरज भासल्यामुळे कॅन्टीन, खानावळी, छोट्या हॉटेल्स आणि चहा विक्रेत्यांचा व्यवसाय फोफावेल. कोर्टात येणाऱ्या लोकांसाठी प्रवासाची गरज भासल्याने ऑटोचालक, कॅब चालक, ट्रॅव्हल एजन्सीज आणि वाहन भाड्याने देणाऱ्यांना उत्पन्नाची चांगली संधी मिळेल.

**९- समारोप :**

सर्किट बेंचची स्थापना म्हणजे केवळ न्यायालयीन सुविधा उपलब्ध करून देणे नव्हे, तर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारा एक व्यापक धोरणात्मक टप्पा आहे. कोर्टाशी संबंधित पूरक सेवा व व्यवसाय अनेक लोकांना लघु उद्योग व स्वयंरोजगार म्हणून दिशा देऊ शकतात. कोल्हापूरसारख्या प्रगत जिल्ह्यात याचा सकारात्मक परिणाम अधिक प्रमाणात दिसून येईल.

सर्किट बेंचची स्थापना ही केवळ न्यायप्रणालीसाठीच नाही, तर स्थानिक सामाजिक व आर्थिक विकासासाठी एक निर्णायक पाउल ठरू शकतो. कोल्हापूर जिल्हा हा एक ऐतिहासिक, सांस्कृतिक व औद्योगिक दृष्टीकोनातून प्रगत भाग असून, येथे सर्किट बेंच स्थापन झाल्यामुळे कायदे संबंधित सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील. या सुविधामुळे वकिल, न्यायालयीन कर्मचारी, पूरक सेवा क्षेत्र यामध्ये रोजगाराच्या संधी वाढतील. त्याचबरोबर, लॉजिंग, खानपान, स्टेशनरी, ट्रॅव्हल इत्यादी व्यवसायांना चालना मिळेल. या संशोधनात कोल्हापूरच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा, सध्याच्या आर्थिक स्थितीचा व संभाव्य बदलचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. सर्किट बेंच कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकणार आहे.

**संदर्भ :**

१- डॉ. पाटील उज्वला, भारतीय संविधान आणि न्यायव्यवस्था (२०१८), डोमिनेंट पब्लिकेशन्स, पुणे

२- डॉ. मिश्र एस. एन., भारतातील न्यायालयीन प्रशासन (२०१६), सेंटर फॉर लॉ अँड पॉलिसी रिसर्च,

दिल्ली.

३- Regional Development and Planning in India (2021): Janki Jiwan; Rawat Publications.

४- Times of India (Pune / Kolhapur) दि. 2–3 ऑगस्ट 2025 “Bombay High Court circuit bench to go functional in Kolhapur from Aug 18”

५- Times of India – Kolhapur (Aug 3, 2025) “Preparations on in full swing after high court approved circuit bench…” — काम –काजाच्या भारात कपात; नवीन कामकाजी कर्मचारी भरती; स्थानिक कायदा व्यवसायाला प्रोत्साहन

६- Pudhari वृत्तसेवा, दि. 3 ऑगस्ट 2025 व्यापारी– उद्योग क्षेत्रातून वकिलांचा सत्कार, उद्योग क्षेत्रात उत्साह — स्थानिक व्यावसायिकांनी महसूस केली आशा आणि संभावनांची वातावरणिक बदल.